आरोग्य सेवा

जा. क्र./जिआअधि/QA/ 1164 /2026
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय,
सिंधुदुर्गनगरी दिनांक 30-03/2026

## दरपत्रक सुची

जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हास्तरावर प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-जनमन) आदिवासी समूहांच्या (पीव्हीटीजी) साठी मोबाईल मेडिकल युनिटसाठी मनुष्यबळ १ डॉक्टर(MBBS Doctor or Ayush Doctor), १ नर्स(ANM/Staff Nurse), १ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (DMLT), १ फार्मासिस्ट(Diploma in Pharmacy ) हि पदे बाहयस्त्रोत संस्थेद्वारे भरणेकरीता सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरची बाहयस्त्रोत संस्था निश्चित करणेकरीता दरपत्रक पध्दतीने करणे प्रस्तावित आहे.

त्यासाठी पुरवठादाराकडून खालील अटीच्या अधिन राहून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अटींची पुर्तता करणाऱ्या पुरठादऱ्यांनी दरपत्रके खालील सही करणार यांच्या नावे दिनांक ०६/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान,सिंधुदुर्ग येथे आणून देणेचे आहे. सदर दरपत्रके दिनांक ०६/०४/२०२६ सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील.

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती

1) नियुक्त सेवा सोसायटीने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे नावे करारपत्र रु. १००/- गैरन्यायिक बंधपत्रावर तयार करुन घेणेचे आहे.
2) संबधित संस्थेचे नोंदणीपत्रक, पॅनकार्ड व आवश्यक ते सर्व पात्रतेचे निकष पुर्ण असणे आवश्यक आहेत. तसेच पात्रतेसंबंधी सर्व विहित कागदपत्रे सुपुर्द करणे आवश्यक आहे.
3) नियुक्त सोसायटीने नियुक्त करावयाच्या मनुष्यबळाला किमान वेतन कायदयाआधारे, धनादेशाचे माध्यमातून रोजंदारी देणे बंधनकारक आहे. तसेच Employee Proviend fund, Employee State Insurance Corporation, Professional Tax या बाबत कायादयानुसार पुर्तता करणेची जवाबदारी संस्थेची आहे.
4) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.
5) कामासाठी नियुक्त करणेत येणारी व्यक्ती प्रकृतीने निरोगी असणे आवश्यक आहे.
6) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तींकडून सदरचे करारपत्र हे कार्यआदेश दिलेनंतर उमेदवार हजर होईल. त्यादिवशी मुळप्रतीत सादर करणे बंधनकारक आहे.
7) कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं ६.३० पर्यंत असेल. सदरचे मोबाईल मेडिकल युनिटसाठी १ डॉक्टर(MBBS Doctor or Ayush Doctor), १ नर्स(ANM/Staff Nurse), १ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (DMLT), १ फार्मासिस्ट(Diploma in Pharmacy ) हे कर्मचारी यांना नियुक्त करुन कामकाज ATP प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयांमधील दुर्गम आणि अतिदुर्गम भागामध्ये ज्याठिकाणी आरोग्याच्या सेवांपासून लोक वंचित अशी २० गावे ठरविण्यात आलेली आहेत. एकूण २५ दिवसामध्ये ५० गावांमध्ये जावून रुग्ण तपासणी करणे, औषधोपचार, लॅब टेस्ट, जावून करावी लागेल.
8) उमेदवाराला कामावर जाणेयेणेचा खर्च तसेच अन्य भत्ते शासनाकडून देय नाहीत.
9) कामाचे देयक दर महिन्याचे २ तारखेचे आत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे नावे मुळ प्रतीत सादर करणे बंधनकारक राहिल.
10) देयक अदा करताना शासकीय प्रचलित नियमांनुसार करवजावटी करणेत येतील.
11) संस्थेने नियुक्त केलेल्या उमेदवारांचे देयक नेहमी धनादेशाच्या माध्यमातून बॅंक खातेत जमा करणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

12) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीने काम सोडलेस त्याची पर्यायी व्यवस्था २४ तासांत करावी. विलंब १ आठवडयापेक्षा झालेस प्रति आठवडा ०.५ टक्के एवढी कपात देयकातून करणेत येईल आणि चार आठवडयानंतर कार्याआदेश संपृष्टात येईल.

13) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीला शासकीय सेवेसाठी अगर इतर कोणत्याही शासकीय हक्कासाठी दावा करता येणार नाही.

14) दरपत्रकातील दर हे सर्व करासहित असावे.

15) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीस आरोग्य संस्थेमधील कामकाजाचा अनुभव असावा.

16) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्ती स्वच्छ चरित्र असलेली असावी. ती गुन्हेगारी पार्श्वभूमीची असू नये.

17) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीचे काम समाधानकारक, सौजन्यपूर्ण वर्तणुक, नेमून दिलेले काम वेळेत पुर्ण करणे अपेक्षित आहे. कोणतेहि नुकसान झालेस मनुष्यबळ पुरविणारे संस्थेकडून त्याची प्रत्यक्ष किंमत एवढी वसूल केली जाईल.

18) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीला कामावर येतांना व जाताना कोणताही अपघात अगर तत्सम इजा किंवा दुखापत झालेस त्याची जबाबदारी ही कत्राटदाराची राहील. यावर शासन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणार नाही.

19) कार्यआदेश दिलेपासून ७ दिवसात मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेने नियुक्तीपत्र देऊन पाठविणेचे आहे.

20) कामाची मुदत संपलेनंतर कोणतीही स्वतंत्र सुचना न देता कार्यआदेश संपुष्टात येतील.

21) सेवा पुरविणेचा कालावधी हा मनुष्यबळ हजर झालेल्या दिनांकापासून ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंतचा असेल.

22) मनुष्यबळ पुरविणेची संख्या चार राहील. याबाबत आवश्यक सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी (कार्यकारी समिती) यांचेजवळ राहतील. याबाबत कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही. अगर न्यायालयात जाता येणार नाही.

प्रत -

कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.

सचिव
सि.जि.ए.आ.व कु.क.सो.औ
(कार्यकारी समिती) तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

Scanned with CamScanner